## नियमित दिवाणी दावा क्रमांक ९८९/२०१८ मधील नि.५९ वरील आदेश

*(सखाराम यशवंत बर्डे व इतर **विरुध्द** दत्तु किसन बर्डे व इतर)*

## (दिनांक १०/०३/२०२५ रोजी)

वादी क्र.१ ब तर्फे प्रतिवादी नं.६ चे विरुध्दचा झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** वादी क्र.१ ब थोडक्यात असे म्हणणे आहे की, वादी यांनी दावा वाटप व मनाईचे कामी दाखल केलेला असुन सदरचे दाव्याचे कामकाज चालु असतांना प्रतिवादी नं. ६ हे दिनांक ०२/०१/२०१९ रोजी मयत झालेले असुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी जाणीवपुर्वक उशीर केला असे घडलेला नाही, वादीने वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत वादीचे वकिलांनी वेळेत सुचना दिल्या नाही. तसा वादींचा मालाफाईड हेतु देखील नव्हता. परंतु, सदरचा अर्ज प्रतिवादी नं.६ चे मृत्यूनंतर ६ वर्षे १ महिना १७ दिवस वारस रेकॉर्डवर घेणेकामी उशीर झालेला आहे. परंतु, वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा प्रतिवादी नं.६ यांचे विरुध्द दावा अबेट झालेला आहे. मुळातच उशीर माफीच्या अर्जात सविस्तर कथन केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. सबब, प्रतिवादी नं.६ यांचे विरुध्द केलेला अबेटमेंट सेट असाईड करुन वारस रेकॉर्डवर घेण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की, अर्ज खरा व बरोबर नाही, प्रतिवादी यांना मान्य नाही, वादी यांनी जाणूनबुजून उशीर केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर केल्यास कॉस्टचा हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. वादी यांनी विहीत मुदतीमध्ये मयत प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते परंतू वादीस मयत प्रतिवादी नं.६ चे वारस अभिलेखावर दाखल करणेस विलंब झाल्याने दावा त्यांच्याविरुध्द उपशमित/अबेट झाला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास वादींना ६ वर्षे इतका अवाजवी उशीर झाला असुन अर्जामध्ये झालेल्या विलंबास विस्तृत कारण नमुद केलेले नाही परंतु, प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज जास्तीत जास्त कॉस्ट करुन मंजुर करावा अशी देखील वैकल्पीक मागणी केल्याने अर्ज

मंजुर करण्यास प्रतिवादींचा पुर्णतः विरोध नाही असे देखील दिसुन येते. तसेच, वादी यांनी प्रतिवादी क्र.६ यांच्या वारसांचे माहिति नमुद करुन सदर वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दिला असुन दावा गुणदोषावर चालण्यासाठी सदर अर्ज न्यायाच्या हितार्थ मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, दाव्यात झालेला (Abatement) अवसानीचा आदेश खर्चासह माफ करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतोः-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (**नि.५९**) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी नं.१ब यांनी प्रतिवादींना रक्कम रु.५००/- खर्च द्यावा.

३. वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

संगमनेर

दि. १०/०३/२०२५.

स्वाक्षरीत/-

(श्रीमती एस. बी. ढवळे)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.